*वाचनसंस्कृती आणि आधुनिकता यांचा संगम*

**उत्कृष्ट सार्वजनिक वाचनालय पुरस्कार प्राप्त !**

# “अजिवा”

## अहमदनगर जिल्हा वाचनालय (विश्वस्त संस्था)

**स्थापना : १८३८**

# १८० वा वार्षिक अहवाल

## सन २०१७- १८

भावपूर्ण . . .



# श्रध्दांजली

संस्था व वाचनालयाचे आजीव सभासद,वाचक सभासद,

हितचिंतक तसेच साहित्य, समीक्षा, नाट्य, संगीत

अध्यात्म, लष्कर, देशभक्त, तत्वज्ञ, समाजकारणी

राजकारणी व ग्रंथालय चळवळ

इत्यादी क्षेत्रात भारतातील

ज्या थोर व्यक्तींनी आपल्या पराक्रमाने

भारताची शान वृध्दिंगत केली,

अशा संपन्न व समृध्द दिवंगत व्यक्तीमत्वाना

## भावपूर्ण श्रध्दांजली

अहमदनगर जिल्हा वाचनालय ( विश्वस्त संस्था )

व सावेडी वाचनालय

अहमदनगर

२०१७ -२०१८

रजि.नं.-पी.टी.आर.ई.-१३

# अहमदनगर जिल्हा वाचनालय (विश्वस्त संस्था)

## *विश्वस्त मंडळ*

## सन२०१६-१७ ते २०२०-२१.


| | | |
|---|---|---|
| १. | प्रा.शिरीष मोडक | अध्यक्ष |
| २. | शिल्पा रसाळ | उपाध्यक्षा |
| ३. | श्री.अजित रेखी | उपाध्यक्ष |
| ४. | श्री. विक्रम राठोड | प्रमुख कार्यवाह |
| ५. | श्री. तन्वीर खान | खजिनदार |
| ६. | श्री.उदय काळे | सह कार्यावाह |
| ७. | श्री.अनिल लोखंडे | सदस्य |
| ८. | डॉ.राजा ठाकूर | सदस्य |
| ९. | श्री. राहुल तांबोळी | सदस्य |
| १०. | श्री. अनंत देसाई | सदस्य |
| ११. | श्री. दिलीप पांढरे | सदस्य |
| १२. | प्रा.सौ.ज्योती कुलकर्णी | सदस्या |
| १३. | श्री.संजय चोपडा | सदस्य |
| १४. | डॉ. शैलेंद्र पाटणकर | सदस्य |
| १५. | श्री. किरण आगरवाल | सदस्य |

निमंत्रित सदस्य :-

१.श्री.चंद्रकांत पालवे २.श्री.गणेश अष्टेकर

# अहमदनगर जिल्हा वाचनालय (विश्वस्त संस्था)

## *कर्मचारी वृंद*

| | | |
|---|---|---|
| श्री. संजय लिहिणे (बी.ए.बी.लिब.) | - | ग्रंथपाल |
| श्री.अमोल इथापे (बी.ए.एम.लिब.) | - | सहाय्यक ग्रंथपाल |
| श्री.नितीन भारताल (बी.कॉम,बी.लिब.) | - | अकौंटंट |
| सौ.अलका घबाडे | - | ग्रंथालय सहाय्यक |
| कु.पल्लवी कुक्कडवाल (बी.ए.बी.लिब.) | - | ग्रंथालय सहाय्यक |
| श्री.ओंकार बडगु (बी.कॉम) | - | ग्रंथालय सहाय्यक |
| श्री.सिंकदर शेख | - | ग्रंथालय सहाय्यक |
| श्री.आशिष तरोटे | - | ग्रंथालय सहाय्यक |
| सौ.वर्षा जोशी | - | ग्रंथालय सहाय्यक |
| श्री.विठ्ठल शहापूरकर | - | शिपाई |
| सौ.उमा देशपांडे | - | (सावेडी वाचनालय) ग्रंथपाल |

### अहमदनगर जिल्हा वाचनालय
### *पदसिध्द ग्रंथालय शासन समिती*

मा.श्री.सु.हि.राठोड
प्र.ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

| | | | |
|---|---|---|---|
| प्रा.शिरीष मोडक<br>अध्यक्ष | श्री.विक्रम राठोड<br>प्रमुख कार्यवाह | शिल्पा रसाळ<br>उपाध्यक्षा | श्री.अजित रेखी<br>उपाध्यक्ष |
| श्री.किरण आगरवाल<br>सदस्य | श्री.तन्वीर खान<br>खजिनदार | श्री.उदय काळे<br>सहकार्यवाह | श्री.राहुल तांबोळी<br>सदस्य |
| श्री.दिलीप पांढरे<br>सदस्य | श्री.संजय लिहिणे<br>ग्रंथपाल,जिल्हा वाचनालय | सौ.उमा देशपांडे<br>ग्रंथपाल, सावेडी वाचनालय | |

अहमदनगर जिल्हा वाचनालय व सावेडी वाचनालय, अहमदनगर
*हिशोब तपासनीस*
श्री.के.जी.सप्तर्षी ॲण्ड कंपनी, अहमदनगर

**रजि.नं.पी.टी.आर.इ - १३** **दिनांक : ०२/१२/२०१८.**

# अहमदनगर जिल्हा वाचनालय (विश्वस्त संस्था)

सन २०१७-२०१८ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे परिपत्रक

(फक्त विश्वस्त संस्था सभासदांसाठी)

अहमदनगर जिल्हा वाचनालय विश्वस्त संस्थेची सन २०१७-२०१८ ची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक १६/१२/२०१८ रोजी सकाळी ठिक ११ वा. जिल्हा वाचनालयाच्या लो. टिळक सभागृहात संस्थेचे अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक यांच्या अध्यक्षतेखाली, खालील विषयांवर विचार करण्यासाठी घेण्यात येणार आहे. तरी आपण सदर सभेस वेळेवर उपस्थित राहवे,हि विनंती.

***विषय :-**

(१) मागील सर्वसाधारण सभा दि.२६/११/२०१७ चा वृत्तांत वाचून कायम करणे.

(२) सन २०१७ - २०१८ चा अहवाल कायम करणे.

(३) हिशोब तपासनीस श्री. के.जी.सप्तर्षी ॲण्ड कंपनी यांचे कडून तपासून आलेल्या सन २०११७-१८ चा जमाखर्च, ताळेबंद, पत्रकास मंजुरी देणे.

(४) विश्वस्त संस्था व वाचनालयाच्या सन २०१८ - २०१९ च्या अंदाज पत्रकास मंजुरी देणे.

(५) सन २०१८- २०१९ सालासाठी हिशोब तपासनीसांची नेमणूक करणे.

(६} सभासदांकडे बाकी असलेले व परत न आलेली यादी प्रमाणे पुस्तके बाद करणे व त्यांचे डिपॉझीट फॉरफीट करणे बाबत.

(७) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर विचार करणे.

आपला,

**विक्रम राठोड**

प्रमुख कार्यवाह

अहमदनगर जिल्हा वाचनालय, ( विश्वस्त संस्था )

**टिप** : १. सभेचे कामकाज संस्थेच्या घटनेतील नियमानुसार होईल.

२. सभेस आवश्यक गणपूर्ती न झाल्यास नियमांनुसार अर्ध्या तासानंतर उपस्थित सभासदांच्या उपस्थितीत सभेचे कामकाज होईल.

३. ज्या सभासदांना प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी लेखी प्रश्न दि. १४/१२/२०१८ रोजी सायं.७ वाजेपर्यंत वाचनालयाचे ऑफिसमध्ये आणून द्यावेत. आयत्या वेळी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**सूचना** - १. सन २०१७-२०१८ चा वार्षिक अहवाल व सन २०१७-१८ च्या जमा खर्चाची व उत्पन्न खर्चाची पत्रके वाचनालयाच्या www.ajivalibrary.org या वेबसाईट वर उपलब्ध आहेत. कृपया नोंद घ्यावी.

२. आपण आपला इमेल व मोबाईल नंबर पूर्ण पत्यासह वाचनालयात कळवावा.

# अध्यक्षीय निवेदन

**सन्मानीय बंधू भगिनीनो......**

**अहमदनगर जिल्हा वाचनालय व विश्वस्त संस्थेचा सन. २०१७-२०१८ चा वार्षिक अहवाल आपल्या समोर सादर करताना मला आनंद होत आहे.**

**वाचन प्रिय मित्र हो,**

अहमदनगर जिल्हा वाचनालय विश्वस्त संस्था ग्रंथालय शास्त्राचे जनक पद्मश्री एस. आर.रंगनाथन यांनी सांगितलेल्या पंच सूत्राप्रमाणे कार्यरत आहे.डॉ.एस.आर.यांनी ग्रंथालया विषयी पाच सूत्रे सांगितली आहेत.१)प्रत्येक वाचकाला त्याला हवा असलेला ग्रंथ मिळाला पाहिजे.२)प्रत्येक ग्रंथाला त्याचा वाचक मिळाला पाहिजे.३)ग्रंथ हे उपयोगासाठी आहेत.४)वाचकांचा व ग्रंथालय सेवकांचा वेळ वाचवावा.५)ग्रंथालय ही वर्धिष्णू संस्था आहे.या सूत्रांना अनुसरून वाचनालय वाटचाल करीत आहे.वाचनालयाचा मुख्य उद्देश वाचन साहित्याचा संग्रह करणे,जतन करणे व त्याचा प्रसार व प्रचार करणे असा आहे. त्या तत्वानुसार वाचनालयातील वाचन संग्रह दिवसेंदिवस वाढत आहे आज वाचनालयात १,१०,००० ग्रंथ आहेत. १८० वर्षाची जुनी परंपरा असलेल्या वाचनालयात २५०० सभासद यांचा लाभ घेत आहेत.मराठी,हिंदी,इंग्रजी,भाषेतील पुस्तकां बरोबर ब्रेल लिपीतील पुस्तके वाचनालयात संग्रही आहेत.वाचन वृद्धीसाठी प्रोत्साहन देत असताना लेखकांना प्रोत्साहन देण्यासाठी उत्कृष्ट साहित्य कृतीस पुरस्कार देणे सुरु असून गेल्या दोन वर्षापासून कै.पद्माकर डावरे स्मृति विनोदी मराठी लघुकथा लेखन स्पर्धा श्री.रविंद्र डावरे यांचे सहकार्याने राज्यस्तरीय विनोदी मराठी लघुकथा लेखन स्पर्धा घेण्यात येत आहे.यास चांगला प्रतिसाद लाभला विजयी स्पर्धकांना समारंभ पूर्वक पारितोषिके प्रदान करण्यात आली.

अहवाल वर्षात वाचनालयाने वाचन प्रेरणा दिन, मराठी राज्यभाषा दिन,व्याख्यानमाला इ.चे आयोजन करून वाचनालय लोकाभिमुख करण्याचा प्रयत्न जाणीवपुर्वक करण्यात आला आहे.

वाचकांच्या सोयीसाठी सावेडी उपनगरात सावेडी वाचनालय चालवले जात आहे २०१० पासून हे वाचनालय सुरळीत चालू आहे.

मा.प्र.ग्रंथालय संचालक श्री.सु.हि.राठोड साहेब,मुंबई मा,सहाय्यक ग्रंथालय संचालक श्री. आशिष ढोक तसेच अ.नगर जिल्हा ग्रंथालय अधिकारी श्री.अशोक गाडेकर साहेब व त्यांचे सहकारी तसेच आर.आर.आर.फौंडेशनचे क्षेत्रीय अधिकारी श्री.अनंत वाघ यांचे वाचनालयास वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य लाभले व लाभत आहे.वाचनालयाचे प्रमुख कार्यवाह श्री.विक्रम राठोड, उपाध्यक्ष श्री.अजित रेखी,उपाध्यक्षा शिल्पा रसाळ,खजिनदार श्री.तन्वीर खान,सहकार्यवाह श्री.उदय काळे या पदाधिकाऱ्याच्या कार्यकौशल्याने वाचनालय प्रगती करीत आहे.याच बरोबर श्री.राहुल तांबोळी, डॉ.शैलेंद्र पाटणकर,श्री.किरण आगरवाल,श्री.दिलीप पांढरे श्री.अनंत देसाई, श्री.अनिल लोखंडे, श्री.संजय चोपडा,प्रा.ज्योती कुलकर्णी, डॉ.राजा ठाकुर त्याचप्रमाणे समिती सदस्य श्री.चंद्रकांत पालवे, श्री.गणेश अष्टेकर अशा उत्साही सदस्यांच्या परिश्रमाने वाचनालयात

राबविण्यात आलेले सर्वच उपक्रम जोमाने व उत्साहात पार पडले. या सर्वांचे अभिनंदन व आभार. ग्रंथपाल श्री.संजय लिहिणे, सहा.ग्रंथपाल श्री.अमोल इथापे, अकौंटंट श्री.नितीन भारताल, सावेडी वाचनालयाचे सौ.उमा देशपांडे व सर्व कर्मचारी यांच्या मेहनतीने अनेक उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आले.हे सर्व करीत असताना वाचनालयाच्या कार्याला आपल्या लोकप्रिय दैनिकातून योग्य ती प्रसिद्धी देण्याचे मौलिक काम केलेल्या वृत्तपत्राचे संपादक, पत्रकार बंधू, केबल चालक यांचे आभार मानणे अगत्याचे आहे. तसेच वाचक सभासद, आजीव सभासद, देणगीदारं, हितचिंतक यांच्या सहकार्याबद्दल मन:पूर्वक आभार व धन्यवाद !

**प्रा. शिरीष मोडक**
**अध्यक्ष**
**अहमदनगर जिल्हा वाचनालय (विश्वस्त संस्था),**
**अहमदनगर**

# सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रम २०१७-२०१८

सन २०१११७-१८ या आर्थिक वर्षात वाचनालयाच्या वतीने विविध सांस्कृतिक व सामाजिक उपक्रम हिरीरीने राबविण्यात आले. समाजमनात वाचनालयाचीप्रतिमा उंचावण्यासाठी सामाजिक बांधिलकीतून सर्व नागरिकांसाठी राष्ट्रीय सण, सत्कार, मान्यवरांची जयंती, पुण्यतिथी, व्यक्तिमत्व विकास शिबीर, उद्घाटन, विविध स्पर्धा असे उप्रकम वर्षभर राबविण्यात आले या सर्व उपक्रमांना सर्व थरातून भरघोस प्रतिसाद लाभला.

## *सन २०१७-१८ जयंती, पुण्यतिथी संपन्न :-

अहवाल वर्षात अहमदनगर जिल्हा वाचनालयाच्या वतीने मान्यवर थोर महापुरुषांची व थोर महिलांची जयंती व पुण्यतिथी आदरपूर्वक साजरी करण्यात आली. या प्रसंगी त्या त्या थोर व्यक्तीना नम्र अभिवादन करून त्यांचे प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यांची नावे खालील प्रमाणे आहेत.

**(१) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती :**

शुक्रवार १४ एप्रिल,२०१७

**(२) लोकमान्य टिळक व अण्णाभाऊसाठे जयंती :**

मंगळवार ०१ ऑगस्ट,२०१७

**(३) राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती :**

सोमवार ०२ ऑक्टोबर,२०१७

**(४) पंडीत जवाहरलाल नेहरू जयंती-बालदिन :**

मंगळवार,१४ नोव्हेंबर,२०१७

**(५) महात्मा ज्योतिबा फुले पुण्यतिथी :**

मंगळवार,२८ नोव्हेंबर,२०१७

**(६) भारत डॉ.बाबासाहेब आंबेडकर महानिर्वाण दिन :**

बुधवार,६ डिसेंबर,२०१७

**(७) सावित्रीबाई फुले जयंती-महिला मुक्तिदिन :**

बुधवार,०३ जानेवारी,२०१८

**(८) नेताजी सुभाषचंद्र बोसजयंती :**

मंगळवार,२३ जानेवारी,२०१८

**(९) महात्मा गांधी पुण्यतिथी :**

मंगळवार,३० जानेवारी,२०१८

**(१०) छत्रपती शिवाजी महाराज जयंती :**

सोमवार,१९ फेब्रुवारी,२०१८

**(११) स्वा.सावरकर स्मृतिदिन :**

सोमवार,२६ फेब्रुवारी,२०१८

***राष्ट्रीय सण समारंभ व ध्वजवंदन :-**

**सोमवार दि. १ मे, २०१७ - महाराष्ट्र दिन - कामगार दिन**

**मंगळवार दि. १५ ऑगस्ट, २०१७ - भारतीय स्वातंत्र्य दिन**

**शुक्रवार दि. २६ जानेवारी २०१८ - भारतीय गणराज्य दिन**

दरवर्षी प्रमाणे अहवाल वर्षात वाचनालयात वरील राष्ट्रीय महत्वाचे समारंभ उत्साहात व थाटात साजरे करण्यात आले. या समारंभास अध्यक्ष. प्रा. शिरीष मोडक, उपाध्यक्ष प्रा.सौ.ज्योती कुलकर्णी व श्री. दिलीप पांढरे प्रमुख कार्यवाह श्री. विक्रम राठोड, सहकार्यवाह श्री. उदय काळे, श्री.अनंत देसाई, श्री.गणेश अष्टेकर, श्री.चंद्रकांत पालवे, ग्रंथपाल श्री. संजय लिहिणे, सहाय्यक ग्रंथपाल श्री.अमोल इथापे, श्री.नितीन भारताल व सर्व कर्मचारी वर्ग तसेच अनेक मान्यवर उपस्थित होते..

***व्यक्तिमत्व विकास वर्ग - शुभारंभ १८ एप्रिल ते २५ एप्रिल २०१७ :**

अहवाल वर्षात वाचनालयाचे वतीने १८ एप्रिल ते २५ एप्रिल २०१७ कालावधीत लहान मुलांमुलींसाठी व्यक्तिमत्व विकास वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. हे शिबीर दोन दशकापासून सातत्याने घेतले जाते. या शिबिरास उत्तम प्रतिसाद लाभला. प्रा. मोडक सर यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रा. ज्योती कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली मुलाना श्लोक,व्यायाम,गोष्टी,काव्य,चित्रकला, हस्तकला, खेळ, अभिनय,पाठांतर,वकृत्व अशा अनेक विषयांवर प्रशिक्षण दिले. या शिबिरात मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांनी नी सहभाग घेतला होता. शिबीराचे उदघाटन प्रा. मोडक सरांच्या हस्ते पार पडले. प्रमुख कार्यवाह श्री.विक्रम राठोड यांनी शिबिरार्थीचे स्वागत केले. सहकार्यवाह उदय काळे यांनी संस्थेचा परिचय करून दिला या प्रसंगी गणेश अष्टेकर यांनी आभार मानले. २५ एप्रिल रोजी सदर शिबिराचा समारोह मा.प्राचार्य अमरजा रेखी यांच्या उपस्थितीत पार पडला या वेळी शिबिरार्थींना पाहुण्यांच्या हस्ते प्रशस्तिपत्रक व खाऊ वाटप करण्यात आला. या वेळी प्रा. मोडक सरांनी आपले मौलिक विचार मांडले व वाचनालयाच्या वतीने ३ महिने मोफत बालवाचक या उपक्रमाची घोषणा केली या वेळी उपस्थित सौ. ज्योती कुलकर्णी, गणेश अष्टेकर, उदय काळे. ग्रंथपाल संजय लिहिणे, खान तन्वीर, श्री.अनिल लोखंडे, किरण अगरवाल व कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

***१ मे महाराष्ट्र दिन व कामगार दिना निमित्त हुतात्म्याना श्रद्धांजली अर्पण :**

१ मे दिनाच्या दिवशी महाराष्ट्र दिन व कामगार दिनाचे औचित्य साधून वाचनालयात हुतात्म्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली या कार्यक्रमा प्रसंगी उपाध्यक्ष श्री.अजित रेखी साहेब अध्यक्ष स्थानी होते त्यांनी या प्रसंगी त्यांनी आपले मौलिक विचार मांडले या कार्यक्रमाला सर्व संचालक मंडळ, कर्मचारी वर्ग, ग्रंथपाल व वाचक उपस्थित होते.

*** वसंत व्याख्यानमाला शुभारंभ सोमवार १५ मे, २०१७ :**

**वक्ते : श्री.चेतन कोळी,पुणे.** विषय-मनःशक्ती आणि मनःशांती

दर वर्षीप्रमाणे वाचनालयाच्या वतीने १५ मे २०१७ ते १९ मे २०१७ असे ५ दिवस सलग विविध विषयांवरील नामवंत व्यक्तीची व्याख्याने आयोजित करण्यात आले या प्रसंगी प्रमुख पाहुणे आ.अनिलभैय्या राठोड, मा.श्री.सु.नि.मुंढे(ग्रंथालय अधिकारी) , व्याख्याते मा.श्री.चेतन कोळी (पुणे), यांच्या हस्ते दीप प्रज्वलन व टिळकांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून प्रास्ताविक प्रा.मोडक सर यांनी केले पाहुण्याचा परिचय श्रीमती.शिल्पा रसाळ यांनी केला पाहुण्यांचा सत्कार प्रा.मोडक सर यांच्या हस्ते पार पडला.यावेळी संचालक मंडळ,वाचक,सभासद,कर्मचारी वर्ग,असंख्य श्रोते उपस्थित होते.

***व्याख्यानमाला पुष्प २ रे मंगळवार १६ मे, २०१७ :**

**वक्ते : मा.श्री तुषार काकडे,पुणे.**

मा.श्री.तुषार काकडे (पुणे) विषय- २१ व्या शतकातील तरुणा पुढील आव्हाने - पुणे येथील काकडे साहेबांनी या विषयावर आपले मौलिक मनोगत व्यक्त केले हा विषय त्यांनी योग्य प्रकारे मांडून तरूण प्रेक्षकांची व श्रोत्यांची मने जिंकली या प्रसंगी वाचनालयाचे सर्व मान्यवर व मोठ्या प्रमाणावर श्रोते उपस्थित होते.

*** वसंत व्याख्यानमाला पुष्प ३ रे बुधवार १७ मे, २०१७ :**

**वक्ते : मा.श्री.श्रीकांत उमरीकर**

मा.श्री.श्रीकांत उमरीकर विषय- वाचन संस्कृती-या विषयावर उमरीकर सरांनी वाचनामुळे मेंदू कार्यान्वित राहतो.उमरीकर म्हणाले वाचन संस्कृती टिकविण्यासाठी एक मराठी व एक इंग्रजी वृत्तपत्र घरी दररोज घ्यावे. प्रा.ज्योती कुलकर्णी यांनी पाहुण्याचा परिचय करून दिला.सूत्रसंचालन शिल्पा रसाळ-जोशी यांनी केले. प्रास्ताविक अध्यक्ष शिरीष मोडक, स्वागत प्र. कार्यवाह विक्रम राठोड यांनी केले,संचालकमंडळ,वाचक,सभासदांनी,मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद दिला.

***वसंत व्याख्यानमाला पुष्प ४ थे गुरुवार १८ मे, २०१७ :**

**वक्ते : मा.राजशेखर सोलापुरे (लातूर).**

मा.श्री. राजशेखर सोलापुरे(लातूर) विषय- सांगा कसे जगायचे? - आपले जगणे अत्तराच्या बाटलीसारखे असावे.सुंगध देता आला पाहिजे,माणसाने नाती आणि माती मनापासून जपली पाहिजे.जगण्याची गणिते दिवसांवर नव्हे,तर अनुभवावर मांडलेली असतात या बद्दल महत्वाचे विचार त्यांनी मांडले श्रोत्यांनी यास भरभरून प्रतिसाद दिला यावेळी राजशेखर सोलापुरे यांचा सत्कार सहकार्यवाह उदय काळे यांनी केला प्रास्ताविक शिल्पा रसाळ व आभार दिलीप पांढरे यांनी मानले.

***वसंत व्याख्यानमाला पुष्प ५ वे शुक्रवार १९ मे, २०१७ :**

**वक्ते : डॉ.आशुतोष यार्दी (नाशिक).**

डॉ. आशुतोष यार्दी विषय - अशा व्यक्ति असे स्वभाव -या कार्यक्रमा प्रसंगी डॉ. आशुतोष यार्दी यांचा परिचय डॉ. राजा ठाकूर यांनी करून दिला व प्रास्ताविक अध्यक्ष प्रा. मोडक सर यांनी केले व सूत्रसंचालन श्रीमती. शिल्पा रसाळ यांनी केले आभार श्री.उदय काळे यांनी मानले या कार्यक्रमा प्रसंगी सर्व सदस्य व मोठ्या प्रमाणा वर श्रोते हजर होते.

***गुरु पौर्णिमा (व्यास पौर्णिमा) एस.आर.रंगनाथन ( ग्रंथालयाचे शास्त्राचे जनक) यांच्या प्रतिमेचे पूजन व ग्रंथ पूजन रविवार ९ जुलै,२०१७ :**

अहवाल वर्षात गुरुपौर्णिमा निमित्त मा.श्री.एस.आर.रंगनाथन ग्रंथलयाचे पहिले ग्रंथपाल यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमास सुरुवात झाली ग्रंथपूजन प्रा. मोडक सर यांच्या हस्ते पार पडले या प्रसंगी प्रा.मोडक सरांनी आपले मौलिक विचार मांडले या प्रसंगी कार्यवाह विक्रम राठोड उदय काळे, दिलीप पांढरे, किरण आगरवाल, शिल्पा रसाळ, ग्रंथपाल संजय लिहिणे, व सर्व कर्मचारी वृंद उपस्थित होते.

***लोकमान्य बाळ गंगाधर टिळक व अण्णाभाऊ साठे जयंती साजरी, सोमवार ०१ ऑगस्ट, २०१७ :**

अहवाल वर्षात १ ऑगस्ट चे औचित्य साधून लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त वाचनालयात निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती या मध्ये शालेय गट व खुला गट यांचा मोठ्या प्रमाणावर समावेश होता कार्यक्रमाची सुरुवातीला लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास प्रा. मोडक सरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून झाली या वेळी प्रमुख मान्यवरांचे भाषण झाले व सर्वांनी लो.टिळक व अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनातील घटनांना उजाळा दिला या कार्यक्रमा प्रसंगी सर्व कार्यकारी मंडळ व कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

***अहमदनगर जिल्हा वाचनालय अयोजित शालेय चित्रकला स्पर्धा रविवार १३ ऑगस्ट, २०१७** : दरवर्षी प्रमाणे अहवाल वर्षात अ.जि.वा. वतीने शालेय चित्रकला स्पर्धा भरविण्यात आली होती या मध्ये वर्गा नुसार गटवारी करून पहिला गट २ री व ३ री दुसरा गट ४ थी व ५ वी या प्रमाणे गट करून स्पर्धा भरविण्यात आल्या होत्या या कार्यक्रमाला शहरातील जास्तीत जास्त विद्यार्थी हजर होते कार्यक्रमाचे उद्घाटन प्रा. मोडक सर यांच्या हस्ते झाले या प्रसंगी श्री. पांढरे, श्री. काळे, श्री.पालवे, श्री.अष्टेकर, श्री.खान, श्री.राठोड, श्री.लोखंडे, सौ.कुलकर्णी, श्रीमती.रसाळ, श्री.तांबोळी, श्री.चोपडा, श्री.लिहिणे, जीडी आर्ट्स शिक्षक वर्ग, कर्मचारी वृंद सर्व कार्यकारी मंडळ व कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

***ग्रंथपाल दिन साजरा, शुक्रवार १२ ऑगस्ट, २०१७ :**

अहवाल वर्षात सालाबाद प्रमाणे ग्रंथपाल दिन साजरा करण्यात आला या प्रसंगी मा.श्री.एस.आर.रंगनाथन यांच्या प्रतिमेस प्रा. मोडक सर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला व ग्रंथ

पूजन करण्यात आले या वेळी प्रमुख मान्यवरांचे भाषणे पार पडली या प्रसंगी श्री.पांढरे, श्री.लिहिणे, श्री.पालवे, श्री.अष्टेकर, श्री.आगरवाल, श्री.रेखी, व कर्मचारी वर्ग, सभासद, वाचक उपस्थित होते.

***१५ ऑगस्ट २०१७ स्वातंत्र्य दिन ध्वजारोहण, मंगळवार १५ ऑगस्ट,२०१७ :**

१५ ऑगस्ट भारतीय स्वातंत्र्य दिना निमित्त वाचनालया मध्ये ध्वजारोहण आयोजित करण्यात आले होते सहकार्य मा.उदय काळे साहेब यांच्या हस्ते ध्वजारोहण पार पडले. या वेळी उपाध्यक्षा शिल्पा रसाळ ,उपाध्यक्ष अजित रेखी,किरण आगरवाल,डॉ.राजा ठाकूर,राहुल तांबोळी,प्रा.ज्योती कुलकर्णी, व सर्व कार्यकारी मंडळ कर्मचारी वृंद उपस्थित होते.

***श्री गणेश चतुर्थी, शुक्रवार २५ सप्टेंबर, २०१७ :**

अहवाल वर्षात अहमदनगर जिल्हा वाचनालयात श्री गणेश मूर्तीची स्थापना श्री गणेश चतुर्थीच्या दिवशी करण्यात आली. प्रमुख कार्यवाह विक्रम राठोड व उपाध्यक्ष दिलीप पांढरे यांच्या हस्ते श्री मूर्तीची स्थापना करून पूजा करण्यात आली. संचालक किरण आगरवाल यांनी स्वत: पुढाकार घेऊन आकर्षक सजावट केली. या प्रसंगी सर्व संचालक मंडळ व कर्मचारी वृंद व वाचक उपस्थित होते.

***श्री गणेश विसर्जन,शनिवार ९ सप्टेंबर,२०१७:-**

श्री पार्थिव गणपती विसर्जन, श्री गणेश पूजन, उत्तरपूजा, महाआरती, संचालक किरण आगरवाल, गणेश अष्टेकर, दिलीप पांढरे, अनिल लोखंडे यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली व गणपती विसर्जन सीना नदी येथे करण्यात आले. या वेळी कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

***चित्रकला व निबंध स्पर्धेचा परितोषिक वितरण समारंभ,शनिवार २३ सप्टेंबर,२०१७**

अजिवा च्या वतीने घेण्यात आलेल्या लो.टिळकांच्या जीवनावरील निबंध स्पर्धा व चित्रकला स्पर्धेतील विजयी स्पर्धकांना पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम लो.टिळक सभागृहात थाटात व उत्साहात पार पडला अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक यांच्या हस्ते पारितोषिक वितरीत करण्यात आले सर्व कार्यकारी,कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

***महात्मा गांधी जयंती,लालबहादूर शास्त्री जयंती सोमवार २ ऑक्टोबर २०१७:-**

अहवाल वर्षात अहमदनगर जिल्हा वाचनालयात महात्मा गांधी जयंती व लालबहादूर शास्त्री जयंती साजरी करण्यात आली या कार्यक्रमा प्रसंगी वाचनालयाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक,यांच्या हस्ते पुस्तकांचे प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले.यावेळेस वाचनालयाचे संचालक-किरण आगरवाल,दिलीप पांढरे,गणेश अष्टेकर,चंद्रकांत पालवे, व सभासद, कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

***वाचन प्रेरणा दिन, रविवार१५ ऑक्टोबर, २०१७ :**

दिवंगत राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनी वाचनालयाच्या वतीने वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. ग्रंथपाल संजय लिहिणे यांच्या हस्ते डॉ.कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.त्यांनी डॉ.कलाम यांच्या कार्याबद्दल कर्तुत्वा संबधी माहिती सांगितली या प्रसंगी सर्वांनी डॉ.कलाम याना श्रद्धांजली अर्पण केली या कार्यक्रमाला सर्व वाचक कर्मचारी व कार्यकारी मंडळ उपस्थित होते.

***दिवाळी अंकाचे वितरण, सोमवार १६ ऑक्टोबर,२०१७ :**

दिवाळीमध्ये वाचनालयाच्या व सावेडी वाचनालयाच्या असंख्य वाचकांसाठी दिवाळी अंक व नवीन मराठी पुस्तकांचे वितरण चा शुभारंभ १६ ऑक्टोबर रोजी उद्योजक.महेश देशमुख यांच्या हस्ते करण्यात आला. या प्रसंगी अध्यक्ष मोडक सर व कार्यवाह विक्रम राठोड यांनी वाचनालय करत असलेल्या समाज उपयोगी कामाची माहिती उपस्थिती समोर दिली. वाचनालयास ज्या व्यक्ती संस्था सहकार्य करीत आहेत त्यांचे कौतुक या वेळी करण्यात आले या समारंभास अनेक वाचक कर्मचारी वृंद कार्यकारी मंडळ उपस्थित होते.

***अजिवा आयोजित कै.पद्माकर डावरे स्मृति विनोदी लघुकथा लेखन स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ :-**

अहवाल वर्षात अहमदनगर जिल्हा वाचनालय आयोजित कै पद्माकर डावरे स्मृति विनोदी लघुकथा लेखन स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ कोपरगाव चे लोकनियुक्त नगराध्यक्ष मा.विजयजी वहाडणे यांच्या हस्ते झाले.प्रा.शिरीष मोडक यांनी पाहुण्याचे स्वागत केले.उपाध्यक्षा शिल्पा रसाळ यांनी पाहुण्याचा परिचय करून दिला ,सर्व विजेते स्पर्धक यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.उपाध्क्ष अजित रेखी,प्र.कार्यवाह विक्रम राठोड,सह.कार्यवाह उदय काळे, दिलीप पांढरे,रविंद्र डावरे दिलीप पांढरे,किरण आगरवाल ,वाचक,सभासद ,कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

***राष्ट्रीय स्फूर्तिगीत गायन स्पर्धेचे आयोजन, गुरुवार २५ जानेवारी, २०१८ :**

२६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त २५ जानेवारी रोजी वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहात राष्ट्रीय स्फूर्तिगीत गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते दोन गटात या स्पर्धा संपन्न झाल्या नंतर लगेच पारितोषिक वितरण समारंभ साजरा करण्यात आला प्रथम लोकमान्य टिळकांच्या पूतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात येऊन कार्यक्रमास सुरुवात झाली. मोठ्या गटात भाऊसाहेब फिरोदिया प्रशाला (प्रथम क्रमांक)व्दितीय क्रमांक समर्थ विद्या मंदिर प्रशाला तर लहान गटात बाई इचलबाई प्रशाला (प्रथम क्रमांक) बाकी इतर शाळेतील विद्यार्थी बक्षीस मिळवले स्पर्धेचे सौ.उमा देशपांड व प्रा.मकरंद खरवंडीकर सर यांनी परीक्षण केले. पारीतोषिक वितरण समारंभ पार पडला या कार्यक्रमास मोठ्या प्रमाणावर वाचक व सभासद उपस्थित होते.

***गणराज्य दिन साजरा, शुक्रवार २६ जानेवारी, २०१८ :** २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त वाचनालयात ध्वजारोहण कार्यक्रम पार पडला ध्वजारोहण सहकार्यवाह श्री. उदय काळे यांच्या हस्ते पार पडले या प्रसंगी श्रीमती.शिल्पा रसाळ, श्री.अजित रेखी,श्री.पांढरे, श्री.लोखंडे, श्री.आगरवाल, सौ.कुलकर्णी, व सर्व कार्यकारी मंडळ व कर्मचारी व वाचक उपस्थित होते.

***मराठी राजभाषा दिन,मंगळवार २७ फेब्रुवारी, २०१८ :**

अहवाल वर्षी २७ फेब्रुवारी रोजी मराठी राजभाषा दिना निमित्त कविवर्य कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेस हार घालून कुसमाग्रज यांचे जीवनावरील पुस्तकांचे प्रदर्शन भरविण्यात आले अनेक कवि उपस्थित होते तसेच याकार्यक्रम प्रसंगी वाचनालयाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक,उपाध्यक्ष अजित रेखी,संचालक किरण आगरवाल,दिलीप पांढरे,कार्यकारी मंडळ, सर्व सभासद व कर्मचारी वृंद यांची उपस्थितीत कार्यक्रम पार पडला.

***जागतिक महिला दिन, बुधवार ०८ मार्च, २०१८ :**

८ मार्च जागतिक महिला दिना निमित्त अहवाल वर्षात महिला कर्मचारी व कर्तव्य दक्ष महिलांचा पुस्तके व गुच्छ देऊन सत्कार करण्यात आला वाचनालयातील उपाध्यक्षा शिल्पा रसाळ यांच्या हस्ते कर्मचारी महिला वर्गाचा सत्कार करण्यात आला कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती. रसाळ यांनी केले. अध्यक्ष मोडक सरांनी वाचनालया बद्दल माहिती दिली व सर्व महिलांचा सत्कार करण्यात आला या प्रसंगी सर्व कर्मचारी वर्ग संचालक मंडळ व वाचक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अहमदनगर जिल्हा वाचनालय ( विश्वस्त संस्था ) वाचनालय विभाग

अहमदनगर जिल्हा वाचनालयात दाखल झालेल्या ग्रंथांचा तपशील

## सन २०१४ - २०१५ ते २०१७ - २०१८

| सन | मराठी | हिंदी | इंग्रजी | एकूण |
|---|---|---|---|---|
| २०१४-२०१५ | १,४८६ | - | १४२ | १,६३८ |
| २०१५-२०१६ | १,५०५ | १० | २४५ | १,७५० |
| २०१६-२०१७ | ९८० | | ३४० | १,३२० |
| २०१७-२०१८ | १२१३ | ३ | ५६ | १,२७२ |

वाचनालयातील सन २०१६-२०१७ अखेर ग्रंथ संख्या - १०३६३६

वाचनालयातील सन २०१७-२०१८ मधील ग्रंथ खरेदी - १,२७२

वाचनालयातील सन २०१७-२०१८ देणगी ग्रंथ संख्या - १११

एकूण - १०५०१९

## सन २०१७-२०१८ वर्षात वाचनालयात घेण्यात आलेली नियतकालिके

| अ.नं. | नियतकालिके | मराठी | हिंदी | इंग्रजी | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | दैनिके | १९ | ०१ | ०४ | २४ |
| २. | साप्ताहिके | ६ | ०२ | ०६ | १४ |
| ३. | पाक्षिके | ०२ | ०३ | १० | १३ |
| ४. | मासिके | ४४ | ०९ | १४ | ६७ |
| ५. | त्रैमासिके | ०३ | - | - | ०३ |
| ६. | वार्षिके | ११७ | - | - | ११७ |
| ७. | ब्रेल | ०२ | - | - | ०२ |

# अहमदनगर जिल्हा वाचनालय ( विश्वस्त संस्था )

सन २०१७-२०१८ मधील ग्रंथ देणगीदार

| अ.नं. | देणगीदारांचे नाव | मराठी | इंग्रजी | हिंदी | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | राजाराम मोहन रॉय फौंडेशन | - | ५४ | - | ५४ |
| २. | चक्रनारायण चंद्रकांत | ०१ | - | - | ०१ |
| ३. | माटे माधुरी | ०७ | - | - | ०७ |
| ४. | कुक्कडवाल पल्लवी | ०७ | - | - | ०७ |
| ६. | शेळके लता | ०२ | - | - | ०२ |
| ७. | माळवदे उर्मिला एम | ०१ | - | - | ०१ |
| ८. | देशमुख अनुराधा | ०२ | - | - | ०२ |
| ९. | चव्हाण सविता राहुल | ०१ | - | - | ०१ |
| १०. | बर्डे संजीवनी रमाकांत | ११ | - | - | ११ |
| ११. | गडाख यशवंतराव | ०१ | - | - | ०१ |
| १२ | काळे मेधा | ०२ | - | - | ०२ |
| १३. | डॉ.मांडे अरुण | ०४ | - | - | ०४ |
| १४. | देशमुख | ०१ | - | - | ०१ |
| १५. | पुरोहित अशोक | ०१ | - | - | ०१ |
| १६. | आपटे मधुसूदन प्रकाश | ०१ | - | - | ०१ |
| १७. | स्नेहालय | २ | - | - | २ |
| १८. | जाधव सर | २ | - | - | २ |
| १९. | देशपांडे विवेक | १ | - | - | १ |
| २०. | गुंदेचा शांतीलाल विजयकुमार | १ | - | - | १ |
| २१. | शिंदे सदाशिव सटवाजी | १ | - | - | १ |
| २२. | परिवर्तन ग्रामीण वाचनालय | १ | - | - | १ |
| २३. | सरहद प्रकाशन | १ | - | - | १ |
| २४. | परदेशी टी.एन. | १ | - | - | १ |
| २५. | लोणे कृष्णकांत | २ | - | - | २ |
| २६. | गुंजाळ कार्तिकी | १ | - | - | १ |
| २७. | तिडके यादव तुकाराम | १ | - | - | १ |
| २८ | कोल्हे शंकरराव प्रतिष्ठान | १ | - | - | १ |
| | एकूण | ५७ | ५४ | | १११ |

**सर्व देणगीदारांचे वाचनालयातर्फे आभार !**

## *वाचनालयात देणगी येणारे वाचन साहित्य*

१. प्रतोद, २.प्रिय रसिक ३. सुवार्ता, ४. सत्यप्रकाश, ५. कामगार जगत, ६.सा.सोधन, ७.संवाद, ८.महा.शासन राजपत्र, ९.सनातन चिंतन, १०.लोकमंथन, ११.आर्य जगत, १२.संस्था जगत, १३. चालू घडामोडी वार्ता, १४.वेद वार्ता, १५.नगर संकेत, १६.नोकरी वय. मार्गदर्शक, १७.थेऑसोफिस्ट, १८.सर्व्हिस फॉर कम्युनिकेटरर्स, १९.शब्द, २०.जागृती, २१.ज्ञानधारा, २२.ऋषीप्रसाद, २३.पुणे पोस्ट, २४.लोकमंथन, २५.वास्तूसंस्कृती, २६.रणधैर्य, २७.नवनीत (हिंदी), २८.हंस (हिंदी) २९.वागर्थ, ३०.नया ज्ञानोद्‌य, ३१.नगर वेध, ३२.रायगडचा युवक, ३३.नवी आशा दिशा, ३४ सूर्यधर्म, ३५ संत नगर टाईम्स,३६.सेल्फ डेव्हलपमेंट.३७.नवशक्ती,३८.फ्री जनरल प्रेस

**सर्व देणगीदारांचे वाचनालयातर्फे आभार !**

# अहमदनगर जिल्हा वाचनालय सन २०१८-२०१९ चे अंदाजपत्रक

| जमा | |
|---|---|
| नं खात्याचे नाव | रक्कम |
| १. वर्गणी व प्रवेश फी | ७,५०,०००.०० |
| २. नुकसान भरपाई | ४,०००.०० |
| ३. ज्यादा/इतर फी | ५,०००.०० |
| ४. अनुदान महाराष्ट्र सरकार | ७,२०,०००.०० |
| ५. साधन सामुग्री अनुदान | ३५,०००.०० |
| ६. देणगी रोख व पुस्तकरूपाने | २,५०,०००.०० |
| ७. रद्दी विक्री | १३,०००.०० |
| ८. तुट | २,०००.०० |
| एकूण रक्कम रु. | १७,७९,०००.०० |

| खर्च | |
|---|---|
| नं खात्याचे नाव | रक्कम |
| १. टेलिफोन खर्च | २५,०००.०० |
| २. किरकोळ खर्च | ४,०००.०० |
| ३. सेवकवर्ग पगार | ८,५०,०००.०० |
| ४. टपाल वर्ग | १,०००.०० |
| ५. वीज/दिवाबत्ती खर्च | ४०,०००.०० |
| ६. प्रवास खर्च | १५,०००.०० |
| ७. वृत्तपत्र मासिक, साप्ताहिक | १,५०,०००.०० |
| ८. ग्रंथ खरेदी | २,००,०००.०० |
| ९. सांस्कृतिक कार्यक्रम | १,००,०००.०० |
| १०. वाहतूक खर्च | १,०००.०० |
| ११. छपाई खर्च | ३५,०००.०० |
| १२. पुस्तक बांधणी | १५,०००.०० |
| १३. स्टेशनरी खर्च | १०,०००.०० |
| १४. डेडस्टॉक खरेदी | ५०,०००.०० |
| १५. स्वच्छता व सफाई | १५,०००.०० |
| १६. टायपिंग व झेरॉक्स | १,५००.०० |
| १७. प्रा.फंड कॉन्ट्रीब्युशन | २०,०००.०० |
| १८. विमा | ७,५००.०० |
| १९. ऑडीट फी | ४,०००.०० |
| २०. डिपॉझिट रिझर्व फंड | १,००,०००.०० |
| २१. विश्वस्त संस्थेला अदा | ५०,०००.०० |
| २२. बांधकाम फंड | ५०,०००.०० |
| २३. संगणक खर्च | ५,०००.०० |
| २४. डाटा एन्ट्री चार्जेस | १०,०००.०० |
| २५. सॉफ्टवेअर खर्च | २०,०००.०० |
| एकूण रक्कम रु | १७,७९,०००.०० |

# अहमदनगर जिल्हा वाचनालय, विश्वस्त संस्थेचे

## सन २०१८-२०१९ चे अंदाजपत्रक

| जमा | |
|---|---|
| नं. खात्याचे नाव | रक्कम |
| १. देणगी | २,५०,०००.०० |
| २. जागा भाडे | ४,०००.०० |
| ३. आजीव सभासद | ५,०००.०० |
| ४. वाचनालयाकडून जमा | १,१०,०००.०० |
| ५. जाहिरातीपोटी जमा | ५५,०००.०० |
| एकूण रक्कम रु. | ४,२४,०००.०० |

| खर्च | |
|---|---|
| नं. खात्याचे नाव | रक्कम |
| १. मिटिंग खर्च | ११,०००.०० |
| २. इमारत दुरुस्ती व देखभाल | १,००,०००.०० |
| ३. इमारत बांधकाम | ५०,०००.०० |
| ४. स्टेशनरी खर्च | ४०००.०० |
| ५. छपाई खर्च | २५,०००.०० |
| ६. लिगल खर्च | १७,०००.०० |
| ७. किरकोळ खर्च | ४,०००.०० |
| ८. जनसंपर्क व शिष्टाचार | १०,०००.०० |
| ९. ऑफिस खर्च | ३२,०००.०० |
| १०. प्रासंगिक खर्च | ४,०००.०० |
| ११. कार्यक्रम खर्च | ४०,०००.०० |
| १२. सावेडी वाचनालय | १,२०.०००.०० |
| १३. टपाल खर्च | २,५००.०० |
| १४. टायपिंग व झेरॉक्स | २,५००.०० |
| १५ ट्रस्ट फंड | २,०००.०० |
| एकूण रक्कम रु. | ४,२४,०००.०० |

# अहमदनगर जिल्हा वाचनालय विश्वस्त संस्था, अहमदनगर

## जमा व खर्च पत्रक दि.०१/०४/२०१७ ते ३१/०३/२०१८ अखेरचे

| जमा | रक्कम | रक्कम | खर्च | रक्कम | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| आरंभीची शिल्लक- | | | किरकोळ खर्च | | ३५०.०० |
| रोख | १२,०६४.०० | | मिटिंग खर्च | | २,०७०.०० |
| शहर सह.बँक बचत ठेव | २,२१,७५४.०० | | ऑफिस खर्च | | २२,९०५.०० |
| शहर सह मुदत ठेव खाते | १३,२०,९९४.०० | | बँक कमिशन | | ३५५.०० |
| | ------------------- | १५,५४,८१२.०० | सांस्कृतिक कार्यक्रम खर्च | | ३३,३२०.०० |
| | | | पाहुणचार व जनसंपर्क | | २,८८७.०० |
| देणगी | | | कोर्ट खर्च | | १०,३५०.०० |
| जाहिरात | | २,३७,७००.०० | स्टेशनरी खर्च | | ३,०२५.०० |
| जागा भाडे | | ६१,०००.०० | टपाल खर्च | | २,१२६.०० |
| बँक व्याज | | २,०४०.०० | इमारत खर्च | | ५,८५५.०० |
| | | ७५,७६६.०० | टायपिंग व झेरॉक्स | | २,०८०.०० |
| उसनवार | | | अखेरची शिल्लक | | |
| अ.नगर जिल्हा वाचनालय | | १०,५०,०००.०० | रोख | ३०,४८६.०० | |
| | | | शहर सह.बँक बचत ठेव | २,१८,७४९.०० | |
| | | | शहर सह मुदत ठेव खाते | २६,४६,७६०.०० | २८,९५,९९५.०० |
| | | | | ---------------- | |
| | | २९,८१,३१८.०० | | | २९,८१,३१८.०० |

| प्रा.शिरीष मोडक | श्री.तन्वीर खान | श्री.विक्रम राठोड | श्री.के.जी.सप्तर्षी |
|---|---|---|---|
| अध्यक्ष | खजिनदार | प्रमुख कार्यवाह | हिशोब तपासणीस |

# अहमदनगर जिल्हा वाचनालय, अहमदनगर

## जमा व खर्च पत्रक दि. ०१/०४/२०१७ ते ३१/०३/२०१८ अखेरचे

| जमा | रक्कम रुपये | रक्कम रुपये | खर्च | रक्कम रुपये | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| आरंभीची शिल्लक | | | डिपोझिट परत | | ५३,१०५.०० |
| रोख | ११,६३५.२५ | | टेलिफोन खर्च | | १८,०६८.०० |
| मर्चंट बँक बचत खाते १७२२ | ३,९०,१८७.५० | | किरकोळ खर्च | | ३,५५५.०० |
| मर्चंट बँक प्रोव्हिंड फंड से. खाते | २,७५०.७४ | | सेवक वर्ग पगार | | ७,८९,१८८.०० |
| मुदत ठेवी प्रोव्हिंड फंड | ३,९२,१९९.०० | | टपाल खर्च | | ३९३.०० |
| मुदत ठेवी वाचनालय | २३,५५,८५५.०० | | वीज खर्च | | ३४,१४०.०० |
| स्टेट बँक ऑफ इंडिया से. खाते | ९,२२,२८०.०० | ४०,७४,९०७.४९ | प्रवास खर्च | | १६,४७२.०० |
| | | | छपाई खर्च | | २५,५३४.०० |
| देणगी | | | वृत्तपत्र व मासिके साप्ताहिके इ. | | १,५१,३७७.०० |
| रोख | ५,०००.०० | | | | |
| पुस्तक रूपाने | ४३,११८.०० | ४८,११८.०० | | | |
| | | | ग्रंथ खरेदी | १,९३,३२०.०० | |
| अनुदान | | | रोख | ४३,११८.०० | २,३६,४३८.०० |
| महाराष्ट्र सरकार | | ५,२८,६८१.०० | देणगी रूपाने | | |
| | | | | | ४,७५५.०० |
| रीसिटस | | | स्टेशनरी | | १,१००.०० |
| वर्गणी | ७,४७,७००.०० | | डेडस्टोक दुरुस्ती | | १,०६६.०० |
| प्रवेश फी | ८,४१५.०० | | व्यक्तिमत्व विकास शिबीर खर्च | | ५४,२९४.०० |
| स्पर्धा प्रवेश फी | ६,२८०.०० | | सांस्कृतिक कार्यक्रम खर्च | | १३,१५५.०० |
| व्यक्तिमत्व विकास शिबीर फी | ४,४००.०० | | प्रो.फंड वर्गणी | | ६,७५८.०० |
| नुकसान भरपाई | १,७९०.०० | ७,६८,५८५.०० | विमा | | ७५.०० |
| | | | बँक कमिशन | | ५,४१०.०० |
| रद्दी विक्री | | १३,५३७.०० | वाहतूक खर्च | | ६,३२४.०० |
| डिपोझिट | | ७४,९४०.०० | स्वच्छता व सफाई | | २३,००५.०० |
| इतर जमा | | २,९९७.०० | डाटा एंट्री चार्जेस | | १३,७२४.०० |
| बँक व्याज | | १,४७,६५४.०० | सॉफटवेअर खर्च | | ३,७५०.०० |
| ॲडव्हानस सेवक वर्ग | | १७,०००.०० | पुस्तक बांधणी | | १६,०००.०० |
| प्रा.फंड सेवक वर्ग | | ६१,८३९.०० | ऑडिट फी | | ३५०.०० |
| | | | ॲडव्हांस सेवक वर्ग | | १,४८७.०० |
| | | | संगणक खर्च | | |
| | | | डेडस्टॉक खरेदी | | |
| | | | कर्ज | | १०,५०,०००.०० |
| | | | विश्वस्त संस्था | | |
| | | | अखेरची शिल्लक | १८,४२०.२५ | |
| | | | रोख | ८७,८८२.५० | |
| | | | मर्चंट बँक बचत खाते १७२२ | २९,७१४.७४ | |
| | | | मर्चंट बँक प्रॉव्हिडंड फंड | ४,२७,०७४.०० | |
| | | | से.खाते | २४,७५,९१२.०० | |
| | | | मुदत ठेवी प्रॉव्हिडंड फंड | १,६९,७३२.०० | ३२,०८,७३५.४९ |
| | | | मुदत ठेवी वाचनालय | | |
| | | | स्टेट बँक ऑफ इंडिया से. खाते | | |
| **एकूण रक्कम रुपये** | | **५७,३८,२५८.४९** | **एकूण रक्कम रुपये** | | **५७,३८,२५८.४९** |

| प्रा.शिरीष मोडक | श्री.तन्वीर खान | श्री.विक्रम राठोड | श्री.के.जी.सप्तर्षी |
|---|---|---|---|
| अध्यक्ष | खजिनदार | प्रमुख कार्यवाह | हिशोब तपासणीस |

# अहमदनगर जिल्हा वाचनालय संचलित सावेडी वाचनालय

## जमा व खर्च पत्रक दि. ०१/०४/२०१७ ते ३१/०३/२०१८ अखेरचे

| जमा | रक्कम रुपये | रक्कम रुपये | खर्च | रक्कम रुपये | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| **<u>आरंभीची शिल्लक</u>** | | | डिपोझिट परत | | १४,५००.०० |
| रोख | १५,६४२.०० | | जागा भाडे | | १,४८,८३०.०० |
| शहर सहकारी बँक | ४९,३७३.०० | | ग्रंथ खरेदी ( रोख) | | २९,९४५.०० |
| मुदत ठेवी | ७६,१२२.०० | १,४१,१३७.०० | ग्रंथ खरेदी (देणगी पुस्तकरूपी) | | ८,२७०.०० |
| | | | स्टेशनरी खर्च | | १,१२४.०० |
| वर्गणी | | २,११,५२५.०० | वीज खर्च | | ६,७२०.०० |
| प्रवेश फी | | २,५१५.०० | कार्यक्रम खर्च | | २,४१०.०० |
| डिपोझिट | | ३९,२६०.०० | ऑफिस खर्च | | ७,७८३.०० |
| जादा फी | | ५००.०० | बँक चार्जेस | | ३५५.०० |
| देणगी पुस्तकरुपी | | ८,२७०.०० | झेरॉक्स खर्च | | २०८.०० |
| बँक व्याज | | ५,४२१.०० | सेवक वर्ग वेतन | | १,३२,२००.०० |
| इतर फी | | ५०५.०० | वृत्तपत्रे मासिक खर्च | | ५,६५०.०० |
| | | | साफसफाई खर्च | | ५,५००.०० |
| | | | दिवाळी बोनस | | ४,३००.०० |
| | | | टेलिफोन खर्च | | १,५५९.०० |
| | | | डेड स्टोक रिपेअर | | १,०५०.०० |
| | | | लिगल चार्जेस | | ५००.०० |
| | | | प्रवास खर्च | | ८०.०० |
| | | | **<u>अखेरची शिल्लक</u>** | | |
| | | | रोख | २८,१६३.०० | |
| | | | शहर सहकारी बँक | ९,९८६.०० | ३८,१४९.०० |
| **एकूण रक्कम रुपये** | | **४,०९,१३३.००** | **एकूण रक्कम रुपये** | | **४,०९,१३३.००** |

| प्रा.शिरीष मोडक | श्री.तन्वीर खान | श्री.विक्रम राठोड | श्री.के.जी.सप्तर्षी |
|---|---|---|---|
| अध्यक्ष | खजिनदार | प्रमुख कार्यवाह | हिशोब तपासणीस |

# अहमदनगर जिल्हा वाचनालय, अहमदनगर

## उत्पन्न व खर्च पत्रक दि. ०१/०४/२०१७ ते ३१/०३/२०१८ अखेरचे

| खर्च | | एकूण रक्कम | उत्पन्न | | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| <u>ट्रस्टच्या उद्दिष्टयावरील खर्च</u> | | | <u>देणगी</u> | | |
| टेलिफोन खर्च | १९,६२७.०० | | रोख | २,४२,७००.०० | |
| किरकोळ खर्च | ३,९०५.०० | | पुस्तक रूपाने | ५१,३८८.०० | |
| सेवक वर्ग पगार | ९,२१,३८८.०० | | जागा भाडे | २,०४०.०० | २,९६,१२८.०० |
| टपाल खर्च | २,५१९.०० | | | | |
| वीज खर्च | ४०,८६०.०० | | <u>अनुदान</u> | | |
| प्रवास खर्च | १६,५५२.०० | | महाराष्ट्र सरकार | | ५,२८,६८१.०० |
| छपाई खर्च | २५,५३४.०० | | | | |
| वृत्तपत्र व मासिके साप्ताहिके | १,५७,०२७.०० | | <u>रिसिटस</u> | | |
| इ. | ६,३२४.०० | | वर्गणी | ९,५९,२२५.०० | |
| डाटा एन्ट्री चार्जेस | ८,९०४.०० | | प्रवेश फी | १०,९३०.०० | |
| स्टेशनरी | २,१५०.०० | | स्पर्धा प्रवेश फी | ६,२८०.०० | |
| डेडस्टॉक दुरुस्ती | १,०६६.०० | | व्यक्तिमत्व विकास शिबीर फी | ४,४००.०० | |
| व्यक्तिमत्व विकास शिबीर खर्च | ९०,०२४.०० | | नुकसान भरपाई | १,७९०.०० | ९,८२,६२५.०० |
| सांस्कृतिक कार्यक्रम खर्च | ६,७५८.०० | | | | |
| विमा | १३,१५५.०० | | रद्दी विक्री | | १४,०३७.०० |
| प्रा.फंड वर्गणी | १०,९१०.०० | | इतर जमा | | ३,५०२.०० |
| स्वच्छता व सफाई | १३,७२४.०० | | बँक व्याज | | २,२८,८४१.०० |
| पुस्तक बांधणी | ३,७५०.०० | | जाहिरातीचे जमा | | ६१,०००.०० |
| ऑडीट फी | ३५०.०० | | | | |
| संगणक खर्च | ७८५.०० | | | | |
| बँक कमिशन | २,०७०.०० | | | | |
| मिटिंग खर्च | १०,८५०.०० | | | | |
| कोर्ट खर्च | २,८८७.०० | | | | |
| पाहुणचार व जनसंपर्क | १,४८,८३०.०० | | | | |
| जागा भाडे | २,२८८.०० | | | | |
| झेरॉक्स | ४,३००.०० | | | | |
| दिवाळी बोनस | ३०,६८८.०० | | | | |
| कार्यालयीन सादिलवार | ५,८५५.०० | १५,५३,०८०.०० | | | |
| इमारत दुरुस्ती खर्च | | | | | |
| <u>घसारा</u> | | | | | |
| ग्रंथ | ३,४८,८७५.०० | | | | |
| संगणक | १८,८१२.०० | | | | |
| फर्निचर व डेडस्टॉक | ९१,३९०.०० | | | | |
| इमारत | ६७,६११.०० | ५,२६,६८८.०० | | | |
| चालू वर्षातील नफा ताळेबंदास वर्ग | | ३५,०४६.०० | | | |
| एकूण रक्कम | | २१,१४,८१४.०० | एकूण रक्कम | | २१,१४,८१४.०० |

| प्रा.शिरीष मोडक | श्री.तन्वीर खान | श्री.विक्रम राठोड | श्री.के.जी.सप्तर्षी |
|---|---|---|---|
| अध्यक्ष | खजिनदार | प्रमुख कार्यवाह | हिशोब तपासणीस |

अहमदनगर जिल्हा वाचनालय, अहमदनगर

## एकत्रित ताळेबंद पत्रक दि.३१/०३/२०१८ अखेरचे

| भांडवल | रक्कम रुपये | रक्कम रुपये | जिंदगी | रक्कम रुपये | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| ट्रस्ट फंड | | | इमारत | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | ३,६३,६०८.७० | | मूळ किमंत | १४,४४,८८१.६० | |
| पुस्तक फंड | ३५,०००.०० | | अधिक नविन बांधकाम | | |
| इक्विपमेंट फंड | ६,८१९.०० | | | १४,४४,८८१.६० | |
| अनुदान इमारतीसाठी | ३७,५००.०० | | वजा घसारा मागील ताळेबंदाप्रमाणे | -७,६८,७६८.६० | |
| अजीव सभासद फी | ८२,२५५.०० | ५,२५,१८२.७० | वजा घसारा चालू वर्षातील १०% | -६७,६११.०० | ६,०८,५०२.०० |
| | | | ग्रंथ | | |
| रिझर्व्ह फंड | ७,२२,२९२.२० | | मूळ किमंत | ५८,२७,२३४.९० | |
| इमारत निधी | ७०,०००.०० | ७,९२,२९२.२० | अधिक नविन | २,७४,६५३.०० | |
| इतर देणे | | | वजा घसारा मागील ताळेबंदाप्रमाणे | ६१,०१,८८७.९० | |
| भविष्य निर्वाह निधी | ४,५६,७८८.७४ | | वजा घसारा चालू वर्षातील १५ टक्के | -३७,७६,०४८.१४ | |
| वाचनालय डिपोझिट | ९,८८,५३१.०० | | | -३,४८,८७५.०० | १९,७६,९६४.७६ |
| ऑडिट फी देणे | २,०००.०० | १४,४७,३१९.७४ | | | |
| | | | लोकमान्य टिळक पुतळा | | |
| | | | मागील ताळेबंदाप्रमाणे | | ३,७१४.४५ |
| सेवक वर्ग ॲडव्हांस | | ७,३३०.०० | | | |
| | | | संगणक | | |
| उत्पन्न व खर्च खाते | | | मूळ किमंत | २,०९,२३५.०० | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | ७१,७७,२४०.३६ | | अधिक नविन | २३,००५.०० | |
| अधिक चालू वर्गातील नफा | ३५,०४६.०० | ७२,१२,२८६.३६ | | | |
| | | | | २,३२,२४०.०० | |
| | | | वजा घसारा मागील ताळेबंदाप्रमाणे | -१,५६,९९२.०० | |
| | | | वजा घसारा चालू वर्षातील २५% | -१८,८१२.०० | ५६,४३६.०० |
| | | | फर्निचर व डेडस्टॉक | | |
| | | | मागील ताळेबंदाप्रमाणे | १७,१२,१२९.५० | |
| | | | अधिक नविन | १,४८७.०० | |
| | | | | १७,१३,६१६.५० | |
| | | | वजा घसारा मागील ताळेबंदाप्रमाणे | -७,९९,७०७.२० | |
| | | | वजा घसारा चालू वर्षातील १०% | -९१,३९०.०० | ८,२२,५१९.३० |
| | | | ॲडव्हान्स | | ३,६७,९३०.०० |
| | | | मागील ताळेबंदाप्रमाण | | |
| | | | इतर येणे | | |
| | | | महाराष्ट्र राज्य विज मंडळ | ४,०६५.०० | |
| | | | गॅस डिपोझिट | १,४००.०० | ५,४६५.०० |
| | | | अखेरची शिल्लक | | |
| | | | रोख वाचनालय | १८,४२०.२५ | |
| | | | रोख संस्था | ३०,४८६.०० | |
| | | | रोख सावेडी | २८,१६३.०० | |
| | | | मर्चंट बँक बचत खाते १७२२ | ८७,८८२.५० | |
| | | | मर्चंट बँक प्रोव्हिडड फंड से. खाते | २९,७१४.७४ | |
| | | | मुदत ठेवी प्रोव्हिंडड फंड | ४,२७,०७४.०० | |
| | | | मुदत ठेवी वाचनालय | २४,७५,९१२.०० | |
| | | | स्टेट बँक ऑफ इंडिया से. खाते | १,६९,७३२.०० | |
| | | | शहर सह. बँक से. ठेव खाते २१६८ | २,१८,७४९.०० | |
| | | | शहर सह. बँक मुदत ठेव खाते | २६,४६,७६०.०० | |
| | | | शहर सहकारी बँक सावेडी | ९,९८६.०० | ६१,४२,८७९.४९ |
| एकूण रक्कम | | ९९,८४,४११.०० | एकूण रक्कम | | ९९,८४,४११.०० |

| प्रा.शिरीष मोडक | श्री.तन्वीर खान | श्री.विक्रम राठोड | श्री.के.जी.सप्तर्षी |
|---|---|---|---|
| अध्यक्ष | खजिनदार | प्रमुख कार्यवाह | हिशोब तपासणीस |